CMYK

दारव्हा तालुक्यातील अवैध दारू विक्री विरोधात कारवाईचा धडाका; ठाणेदार मुळे ॲक्शन मोडवर >> पान 2

सुनियोजित आणि विकसित शहरासाठी पुढील ५० वर्षाचे नियोजन व्हावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 3

केंद्रीय मंत्री जाधव व आमदार खरात यांच्या हस्ते अतिक्रमण धारकांसाठी दुकानांचे भूमिपूजन >> पान 4

**सुविचार**

यशस्वी होण्यासाठी स्पष्ट ध्येय ठेवा.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 278 ■ गुरूवार, दि. 19 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



टेलिव्हिजन गाजवून आता झाडफूंक'मधून अभिनेत्री सुंबुल तौकीर दिसणार प्रमुख भूमिकेत! आतील पान

# डीजीसीएकडून एअर इंडियाला क्लीन चिट

## बोईंग ७८७ विमानांच्या तपासणीत कोणतीही त्रुटी आढळली नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातानंतर बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमानाबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने मंगळवारी (१७ जून) एअर इंडियाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एक उच्चस्तरीय बैठक घेतली. यात बैठकीनंतर बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान सुरक्षा मानकांचे पालन करणारे असल्याचे घोषित करण्यात आले आहे. अहमदाबाद विमान अपघातानंतर बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमानाची चौकशी सुरू आहे. डीजीसीएच्या तपासणीत या विमानात कोणत्याही मोठ्या सुरक्षिततेच्या चिंता किंवा त्रुटी आढळल्या नाहीत. गेल्या गुरुवारी (१२ जून) अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान टेकऑफनंतर काही सेकंदात कोसळले. या अपघातात विमानातील २४२ पैकी २४१ जणांचा मृत्यू झाला.

दररोज १००० हून अधिक उड्डाणे सुरू- डीजीसीएने एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत घेतलेल्या या उच्चस्तरीय बैठकीत विमान कंपनीच्या सुरक्षेसह त्यांच्या कामकाजावर





चर्चा केली. एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस यांची सध्या देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात दररोज १००० हून अधिक उड्डाणे सुरू आहेत. या चर्चेनंतर एअर इंडियाच्या बोईंग ७८७ विमानांच्या ताफ्यातील अलिकडच्या तपासणीत कोणत्याही मोठ्या सुरक्षेबाबत चिंता दिसून आल्या नाहीत, असे सांगण्यात आले. विमान आणि संबंधित देखभाल प्रणाली सध्याच्या सुरक्षा मानकांनुसार आढळून आली, असेही डीजीसीएने एका निवेदनात म्हटले आहे.

बोईंग ७८७ ड्रीम लायनरला डीजीसीएची मंजुरी मिळाली- एअर इंडियाच्या बोईंग ७८७ विमानांच्या ताफ्याला डीजीसीएची मंजुरी मिळाली आहे. डीजीसीएचे म्हणणे आहे की, ''विमानांचा ताफा पूर्णपणे सुरक्षित आहे. २४ ड्रीमलायनर्समध्ये चिंतेचे कोणतेही कारण >> पान २

## रस्त्यावर उभ्या असलेल्या टेम्पोला भरधाव वेगातील कारची धडक; जेजुरी-मोरगाव मार्गावर आठ जणांचा मृत्यू



**पुणे/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील जेजुरी-मोरगाव मार्गावर बुधवारी (१८ जून २०२५) सायंकाळी कार आणि पिकअप टेम्पोच्या भीषण अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला. तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. जेजुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेल्या या घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, जेजुरीकडून बारामतीच्या दिशेनं निघालेली एक कार रस्त्यावर उभ्या असलेल्या पिकअप टेम्पोला जोरदार धडकली. या धडकेत पिकअप टेम्पोमधून साहित्य उतरवणारे चार मजूर आणि कारमधील चार प्रवासी यांचा मृत्यू झाला. अपघातात पाच जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीनं जेजुरी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

अपघाताचं नेमकं कारण अस्पष्ट- घटनेची माहिती मिळताच जेजुरी पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना रुग्णालयात हलवण्याची व्यवस्था केली. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले. अपघाताचं नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. मात्र, वेगानं येणारी कार उभ्या टेम्पोवर आदळल्याने हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. >> पान २





## फास्टॅगबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची मोठी घोषणा; सरकार १५ ऑगस्टपासून सुरू करणार वार्षिक पास

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी ( ) यांनी वाहनचालकांसाठी एक महत्त्वाची घोषणा केली आहे. केंद्र सरकार १५ ऑगस्टपासून महामार्गावरील प्रवासासाठी ३,००० रुपयांचा फास्टॅग आधारित वार्षिक पास सुरू करणार आहे.

नितीन गडकरी यांनी वरील पोस्टवर लिहिलं की, ''१५ ऑगस्ट २०२५ पासून ३,००० रुपयांचा फास्टॅग आधारित वार्षिक पास सुरू करण्यात येत आहे. हा पास सक्रिय झाल्याच्या तारखेपासून एक वर्षासाठी किंवा २०० प्रवासांपर्यंत (जे आधी होईल ते) वैध असेल. हा पास विशेषत: गैर व्यावसायिक खासगी वाहनांसाठी (कार, जीप, व्हॅन इ.) डिझाइन केला आहे आणि देशभरातील राष्ट्रीय महामार्गांवर अखंड प्रवास करण्यासाठी सक्षम असेल.''

काय आहेत नियम? : यापुढे त्यांनी म्हटलं की, ''वार्षिक पास सक्रिय करण्यासाठी किंवा नूतनीकरण करण्यासाठी हायवे ट्रॅव्हल ॲप आणि / वेबसाइटवर लवकरच एक वेगळी लिंक उपलब्ध करून दिली जाईल. यामुळं प्रक्रिया आणखी सोपी आणि >> पान २

## वसतिगृहांसाठी तातडीने जागा निश्चित करा – मंत्री अतुल सावे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत ज्या जिल्ह्यांमध्ये वसतिगृहासाठी अद्याप भाडेतत्त्वावर जागा निश्चित करण्यात आलेली नाही, त्या जिल्ह्याचा तातडीने योग्य जागा निश्चित करून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले.

मंत्री सावे यांच्या अध्यक्षतेखाली विभागाच्या १५० दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए.बी. धुळाज, विभागाचे संचालक ज्ञानेश्वर खिल्लारी तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

१०० विद्यार्थी क्षमतेचे मुला-मुलींसाठी ५६ वसतिगृह २६ जिल्ह्यात सुरु करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांच्या कोणत्याही तक्रारी येऊ नयेत यासाठी वसतीगृहांना भेटी देऊन सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत याची खात्री करावी, अशी सूचना मंत्री सावे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिली.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळण्यासाठी नियोजन करण्यात यावे. वसतिगृह



आणि आश्रमशाळांचे जीपीएस मॅपिंग करावे. वसतिगृह व्यवस्थापन आणि नामांकित शाळा पोर्टलची अंमलबजावणी तातडीने करावी. योजना लाभार्थ्यांमध्ये ५० टक्के महिला लाभार्थी असावेत. जिल्हाधिकारी कार्यालये व मंत्रालयात योजनांची माहिती डिजिटल होर्डिंगद्वारे द्यावी. तसेच रोजगार मेळाव्यांचे आयोजन विभागस्तरावर करण्यात यावे. यशोगाथांची माहिती पुस्तिका तयार करावी. विभागातील नवीन भरती प्रक्रिया, प्रशिक्षण, नियुक्त्या आणि रेकॉर्ड अद्ययावतीकरणाची प्रलंबित कामे तातडीने करावी, असेही मंत्री सावे यांनी यावेळी सांगितले.

## सुधाकर बडगुजरांच्या पक्ष प्रवेशाने भाजप पवित्र झाली, एकनाथ खडसेंचा टोला, म्हणाले, माझ्या पक्षप्रवेशावेळी आक्षेप घेतले

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमधील नेते सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. यामुळे नाशिक महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी भाजपची ताकद वाढली आहे. सुधाकर बडगुजर यांची काही दिवसांपूर्वीच ठाकरे गटातून हकालपट्टी करण्यात आली होती, त्यानंतर आता त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. याच मुद्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांची भाजपवर मोठी टीका केली आहे. सुधाकर बडगुजर यांचे दाऊदचा जो हस्तक आहे सलीम कुत्ता त्याच्यासोबतचे डान्सचे फोटो प्रकाशित झाले होते. त्यामुळं भाजपने मोठा विरोध केला होता. पण आता सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानं भाजप आता पवित्र झाल्याचा टोला >> पान २

## घरातून ४ लाखांचे दागिने चोरीला

### पोलिसांनी आरोपीला समोर उभे करताच कुटुंबीयांच्या पायाखालची जमीनच सरकली

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** वर्धा-हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पारधी बेड्यावरील एका घरात दरोडा पडला. अज्ञात चोरट्यांनी घरातील कपाटातून ४ लाख ५० हजार रुपये किंमचीचे दागिने चोरून नेले. घरच्यांना चोरीबाबत कळताच त्यांनी लगेचच पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनीही गुन्हा दाखल करुन घेत शोध सुरू केला. मात्र शोध घेत असतानाच पोलिसांनी कुटुंबीयांची चौकशी केली. चौकशीदरम्यानच त्यांना एक संशय आला आणि चोर थेट पोलिसांच्या जाळ्यातच सापडला. चोरला पाहून कुटुंबीयांच्या पायाखालची जमिनच हादरली.

हिंगणघाट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तरोडा पारधी बेड्यावरील रहिवासी शोभिता चरण भोसले यांच्या घरात कोणी नसताना अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करुन घरातील कपाटातून ४ लाख ५० हजार रुपये किमतीचे ऐवज चोरुन नेल्याची तक्रार हिंगणघाट पोलिस ठाण्यात दिली होती. यासंबंधी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून डिबी पथकाने तरोडा पारधी बेड्यावर जाऊन चोरट्याचा शोध सुरू केला यासंबंधी भोसले कुटूंबाची विचारपूसदेखील केली होती.

चौकशीदरम्यान शोभिता चरण भोसले यांची सून नेहा भोसले हिच्यावर पोलिसांना संशय आला. त्यानंतर तिची कसून चौकशी केली असता तिने चोरीची कबूल दिली. तिने चोरी केलेल्या वस्तू घराचे मागे असलेल्या दोनशे मीटर दूर असलेल्या पाटबंधारे विभागाच्या पडीक जागेत एका पन्नीमध्ये जमिनीत हे सगळं सोनं लपवून ठेवले होते. त्यामध्ये १० हजार रुपये नगदी रोख आणि ४ लाख ५५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने पोलिसांनी जप्त केले आहेत.

पारधी बेड्यावरील झालेल्या चोरीच्या घटनेत पोलिसांना चोर शोधण्याचे मोठे आव्हान असतांना पोलिसांनी तपास चक्र फिरवीत सुनेला अटक केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ सागर कवडे यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडित, पोलीस निरीक्षक देवेंद्र ठाकुर, यांच्या आदेशाने डि.बी. पथकाचे पोलिस उपनिरीक्षक सुनिल राम, प्रशांत ठोबरे,राजेश शेंडे,आशिष नेवारे, मंगेश वाघमारे, रोहीत साठे महिला पोलीस ज्युली मसराम यांनी केली आहे.

## हरित ऊर्जा क्षेत्रात ७ लाखांवर रोजगाराच्या संधीमुळे 'सौर' कौशल्य विकास प्रशिक्षणाला वेग देणे गरजेचे महावितरणचे सीएमडी श्री. लोकेश चंद्र

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात प्रामुख्याने सौर ऊर्जेमुळे पारंपरिक ऊर्जेच्या परिवर्तनाचा वेग वाढला आहे. येत्या पाच वर्षात वीज निर्मितीच्या स्थापित क्षमतेत आणखी ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेची राज्यात भर पडणार आहे. यासह सौर ऊर्जेच्या विविध योजनांमुळे हरित ऊर्जेच्या क्षेत्रात सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रूपयांची गुंतवणूक तसेच सात लाखांवर रोजगारांची निर्मिती होणार आहे. त्यामुळे कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळासाठी बेरोजगार महिला व युवकांना प्रशिक्षण देणे व त्याचा वेग वाढवत नेणे अत्यंत गरजेचे आहे, असे मत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी नाशिक येथे बुधवारी (दि. १८) व्यक्त केले. >> पान २

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री क्षेत्र देहू येथील जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान मंदिरात श्री विठ्ठल रखुमाई मंदिर आणि श्री संत तुकाराम महाराज शिळा मंदिर आणि श्रीराम मंदिरात दर्शन घेतले. त्यांच्या हस्ते मंदिरात श्री गणेश पूजन, कलश पूजन,पाद्य पूजन करून पालखीची विधिवत प्रस्थान पूजा व आरती झाली.

टाळ-मृदुंगाच्या तालावर भक्तिरसात तल्लीन वारकरी.... ग्यानबा तुकाराम, माऊली, माऊली चा गजर.... डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या-पताका घेतलेले वारकरी...

### विठुनामाच्या घोषात श्री संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान

अशा भक्तिमय वातावरणात देहू येथून आषाढी वारीसाठी श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. पंढरीच्या वारीसाठी मोठ्या संख्येने वारकरी देहू नगरीत दाखल झाले होते.यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार श्रीमती सुनेत्राताई पवार, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, आमदार विजय शिवतारे, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे,आमदार शंकर





मांडेकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर मोरे, पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. गणेश महाराज मोरे, ह.भ.प वैभव महाराज मोरे, ह.भ.प दिलीप महाराज मोरे, विश्वस्त ह.भ.प. विक्रमसिंह मोरे, ह.भ.प.उमेश महाराज मोरे, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मोरे आदी उपस्थित होते.दर्शन व पूजेनंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थिती वारकरी माऊलींना वंदन केले. मंदिर संस्थानच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी संस्थानच्या विश्वस्तांशी चर्चा केली.महापुजेनंतर पालखीने इनामदार वाड्यातील मुक्कामाकडे प्रस्थान केले.

CMYK

## आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!

आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा – तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते.आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव! पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली. गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार वारकरी सहभागी झाल्याचा उल्लेख दि ब मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो. आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे. वृद्धांप्रामाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात. वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण! मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते. अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकाऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# दारव्हा तालुक्यातील अवैध दारु विक्री विरोधात कारवाईचा धडाका; ठाणेदार मुळे ॲक्शन मोडवर

दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा/प्रतिनिधी :** दारव्हा पोलिस स्टेशनमध्ये नुकतेच ठाणेदार म्हणून रुजू झालेले शिवप्रकाश मुळे यांनी तालुक्यातील गुन्हेगारीला लगाम घालण्यासाठी तात्काळ कारवाईचा धडाका सुरू केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी अवैध दारू विक्रेत्यांविरोधात धडक कारवाई केली असून, या कारवाईमुळे दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दारव्हा शहरासह ग्रामीण भागात काही ठिकाणी अवैध दारू विक्री सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार प्राप्त होत होत्या. याची



दखल घेत ठाणेदार मुळे यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून कारवाईचे आदेश दिले. पोलिसांनी धाड टाकून तालुक्यातील भांडेगाव,रामगाव, फ ु बगाव,कोव्हळा येथून हातभट्टी व देशी दारूचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणात संबंधित आरोपी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.




ठाणेदार मुळे यांच्या या ॲक्शनमुळे पोलिस प्रशासनाबद्दल जनतेमध्ये विश्वास निर्माण झाला असून अवैध धंद्ये करणार्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.दरम्यान, नागरिकांनी अवैध धंद्यांविरोधात माहिती पोलिसांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांच्या कडून करण्यात आले आहे.

# शिंपोरा येथील पुलाची उभारणी तातडीने करावी

## सभापती प्रा.राम शिंदे आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कर्जत तालुक्यातील (जि. अहिल्यानगर) खेड–मानेवाडी ते शिंपोरा रस्त्यावरील पूल या भागातील शेतकरी, नागरिक, विद्यार्थी यांना रहदारीसाठी महत्वाचा आहे. हा पूल अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे वाहून गेल्याने या भागातील नागरिकांना रहदारीसाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. या परिसरातील नागरिकांना या मार्गावरून सुरळीत वाहतूक सेवा उपलब्ध व्हावी यासाठी हा पूल नव्याने बांधण्याचा प्रस्ताव आठ दिवसात तत्काळ सादर करावा, असे निर्देश विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत विधान भवन, मुंबई येथील बैठकीत दिले.

सभापती प्रा. राम शिंदे आणि ग्रामविकास मंत्री श्री.जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत विधान भवनातील दालनात पूल





उभारण्यासंदर्भात बैठक झाली.

या बैठकीस ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव श्री.एकनाथ डवले, एम.एम. जी.एस.वाय. चे सचिव सतिश चिखलीकर, सहसचिव के.जी.वळवी, उप सचिव प्रशांत पाटील तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर आनंद भंडारी, सोलापूर पुनर्वसन विभाग उजनी अधीक्षक अभियंता श्री. साले, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे श्री.भदाणे उपस्थित होते.ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, पूल वाहून गेल्याच्या प्रकरणाची आठ दिवसात चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात यावी आणि आठ दिवसात नवीन, तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्ट पुल बांधणीबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा, नव्या पुलास लोकभावनेस अनुसरुन ग्रामविकास विभागामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मौजे खेड–मानेवाडी ते शिंपोरा ता.कर्जत, जि.अहिल्यानगर या रस्त्यावरील नांदणी नदीवरील पूल अवकाळी पाऊस व अतिवृष्टीने २५ मे रोजी वाहून गेला. त्यानंतर ९ जून रोजी सभापती प्रा. शिंदे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

या घटनेबद्दल सभापती प्रा. शिंदे आणि ग्रामविकास मंत्री श्री. गोरे यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.या पुलाच्या बांधकामाची चौकशी करावी, यासाठी नेमलेल्या समितीने आठ दिवसांत आपला अहवाल सादर करून दोषींवर कारवाई करावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले. लोकभावनेची दखल घेऊन पुलाची उभारणी आता तातडीने होणार असल्याने परिसरातील रहिवाशांना दिलासा मिळणार आहे, असेही सभापती प्रा.शिंदे म्हणाले.

## टेलिव्हिजन गाजवून आता झाडफूंक'मधून अभिनेत्री सुंबुल तौकीर दिसणार प्रमुख भूमिकेत!

**मुंबई/प्रतिनिधी :** याआधी बऱ्याच प्रसिद्ध टेलिव्हिजन कलाकारांनी सिनेसृष्टीकडे आपला मोर्चा वळवला. छोट्या पडद्यावरील लोकप्रियतेचा फायदा घेत हे कलाकार मोठ्या पडद्यावर आपलं वेगळं अस्तित्व निर्माण करण्याच्या प्रयत्नात असतात. ही प्रवासयात्रा त्यांच्या अभिनय कारकिर्दीत नवे क्षितिज उघडत असते. परंतु बऱ्याच जणांना अपेक्षित यश मिळतेच असे नाही. छोट्या पडद्यावरील मोठी अभिनेत्री सुंबुल तौकीरनं २०१९ मध्ये आलेल्या 'आर्टिकल १५' या चित्रपटात महत्वपूर्ण भूमिका केली होती, ज्याचे विशेष कौतुकही झाले होते. आता ती एका हिंदी चित्रपटात शीर्षक भूमिकेत दिसणार आहे. झाडफूंक' या आगामी चित्रपटात सुंबुल तौकीर प्रमुख भूमिका साकारत आहे. सुंबुल तौकीर तब्बल सहा वर्षांनंतर पुन्हा एकदा सिनेसृष्टीत झळकणार असून, यावेळी ती 'झाडफूंक' या आगामी चित्रपटात प्रथमच मुख्य भूमिकेत दिसणार आहे. याबद्दल बोलताना ती म्हणते, ''हे मी मनापासून इच्छिलं होतं आणि ते प्रत्यक्षात घडलं!''

सुंबुल तौकीरनं व्यक्त केल्या भावना : सुंबुल 'आर्टिकल १५'च्या शूटच्या आठवणी सांगताना म्हणाली की, ''तेव्हा मी स्वतःलाच सतत म्हणायचे, 'पुढच्या वेळी चित्रपटात काम करायचं, तेव्हा मुख्य भूमिकेतच करायचं. मी योग्य संधीची वाट पाहिली आणि माझ्या संयमाचा मला फायदा झाला. नंतर जेव्हा मला झाडफूंकमधील प्रमुख भूमिका ऑफर झाली, तेव्हा सेटवर जाईपर्यंत विश्वासच बसत नव्हता. 'झाडफूंक' हा माझ्या करिअरमधील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे हे निश्चित. ही भूमिका साकारणं म्हणजे मी केलेल्या मॅनिफेस्टेशनचे मोठं यश आहे''.

पान १ वरुन...

## डीजीसीएकडून एअर इंडियाला

आढळले नाही''. सध्या भारतात एकूण ३३ ड्रीमलायनर विमाने आहेत, त्यापैकी २४ विमानांना मंजुरी मिळाली आहे. पुढील ४८ तासांत आणखी तीन विमानांची तपासणी केली जाणार आहे.

विमान सुरक्षा आणि देखभालीकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना – या बैठकीत डीजीसीएने विमान कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना विमान सुरक्षेकडे लक्ष देण्यास सांगितले. देखभालीमध्ये कोणत्याही चुका होणार नाहीत याची विशेष काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक त्रुटींकडे दुर्लक्ष करू नये, असेही बैठकीत सांगण्यात आले. उड्डाण करण्यापूर्वी विमानाने सर्व आवश्यक गोष्टी केल्या पाहिजेत.

## फास्टॅगबाबत केंद्रीय मंत्री

सुलभ होईल.' फास्टॅग पासमुळं रांगेत प्रतीक्षा करण्याचा वेळसुद्धा कमी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. यामुळं टोल नाक्यावरील वाहनांची रांगही कमी होईल, अशी अपेक्षा आहे.

काय होईल फायदा? : नवीन वार्षिक पास धोरणाचा उद्देश हा ६० किलोमीटरच्या परिघात असलेल्या टोल प्लाझांशी संबंधित दीर्घकालीन समस्या सोडवणं आहे. एकाच डिजिटल व्यवहाराद्वारे पेमेंट सोपं करणं, टोल प्लाझावरील प्रतीक्षा वेळ कमी करणं, गर्दी कमी करणं आणि वाद दूर करणं हे त्याचे प्रमुख फायदे आहेत. या घोषणेमुळं लाखो खासगी वाहन चालकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

## रस्त्यावर उभ्या असलेल्या टेम्पोला

पोलिसांकडून अपघाताबाबत तपास सुरू– या अपघातामुळे जेजुरी–मोरगाव मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. स्थानिकांनी घटनास्थळी गर्दी केल्यानंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. मृतांच्या नातेवाईकांना माहिती देण्याचं काम सुरू आहे. हा अपघात परिसरातील रस्त्यांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरला आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून, लवकरच अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

## सुधाकर बडगुजरांच्या पक्ष प्रवेशाने

एकनाथ खडसेंनी लगावला.

सुधाकर बडगुजर आणि घोलप यांच्या भाजप पक्षप्रवेशावरून खडसेंनी स्वत:च्या भाजप पक्षप्रवेशा संदर्भात वक्तव्य केलं आहे. सुधाकर बडगुजर यांचे दाऊद चा जो हस्तक आहे सलीम कुत्ता त्याच्यासोबत चे डान्स चे फोटो प्रकाशित झाले होते. त्यावेळी भाजपने मोठा विरोध केला होता. मात्र, आता सुधाकर बडगुजर यांचा भाजपात प्रवेश झाला आहे. त्यामुळं भारतीय जनता पार्टी ही पवित्र झाली आहे. एकनाथ खडसे यांना भाजपमध्ये प्रवेश देताना आक्षेप आहे म्हणून नाथाभाऊंना प्रवेश दिला गेला नाही. तेव्हा भाजप अपवित्र होत होता असेही एकनाथ खडसे म्हणाले.

कोण आहेत सुधाकर बडगुजर?

सुधाकर बडगुजर हे संजय राऊत यांचे विश्वासू मानले जातात. त्यांच्या राजकीय कारकीर्दीला २००७ मध्ये सुरुवात झाली. ते नाशिक महापालिकेत अपक्ष नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्यावेळी बडगुजर यांनी शिवसेनाला पाठिंबा दिला होता. त्यानंतर २००८ साली त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. २००९ ते २०१२ काळात ते नाशिक महापालिकेचे सभागृहनेते होते. तसेच २०१२ ते २०१५ या काळात बडगुजर हे महापालिकेचे विरोधी पक्षनेते होते. २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणूकीत त्यांचा नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातून पराभव झाला. त्यानंतर त्यांची उपनेते पदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच अनेक गुन्हेगारी घटनांमध्येही बडगुजर यांच्यावर आरोप आहे. आता त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

मी समाजासाठी झटतो, समाजाची सेवा करतो. कोरोना काळात मी अनेक रक्तदान शिबीरे घेतली. कोणी बाहेर येत नव्हते त्यावेळी मी कोविड सेंटर सुरु केलं. पक्षासाठी काम केलं. परंतू नियतीने घाला घातला आणि माझ्यावर कारवाई केली. ज्या पक्षाने माझा अनादर केला, त्या पक्षाला मी सांगू इच्छितो की, महापालिकेच्या निवडणुकीमध्ये दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल असे सुधाकर बडगुजर म्हणाले.

## हरित ऊर्जा क्षेत्रात ७ लाखांवर

महाराष्ट्र सौर कौशल्य कार्यक्रम अंतर्गत महावितरण, आशियाई विकास बँक व मिटकॉन यांच्या संयुक्त सहकार्याने एकलहरे (नाशिक) येथील मुख्य प्रशिक्षण व सुरक्षा केंद्रामध्ये सौर कौशल्य प्रशिक्षणाच्या पहिल्या वर्गाचे उद्घाटन श्री. लोकेश चंद्र यांच्याहस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर कोकण विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे, संचालक (संचालनप्रकल्प) श्री. सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. प्रसाद रेशमे यांची उपस्थिती होती.

महावितरणमध्ये शिकाऊ उमेदवार (अप्रेंटिस) असलेल्या ५७ युवतींना या प्रशिक्षणात प्रथम संधी देण्यात आली आहे. सहा दिवसीय प्रशिक्षणात त्यांना प्रामुख्याने सौर पॅनेल बसवणे, दुरुस्ती करणे, नियमित देखभाल व इतर प्रशिक्षण देण्यात येत आहे. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी प्रशिक्षणार्थींशी थेट संवाद साधला. सौर कौशल्य प्रशिक्षणाच्या राज्यातील पहिल्या तुकडीमध्ये सर्वच प्रशिक्षणार्थी म्हणून महिलांना संधी देण्यात आली याचा त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. भविष्यात हरित ऊर्जेची गुंतवणूक व रोजगाराच्या संधी वेगाने वाढत जाणार आहे. त्यामुळे कुशल मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी आशियाई विकास बँक, महावितरण व मिटकॉन यांचा संयुक्त प्रशिक्षणाची योजना अतिशय स्वागतार्ह आहे असे त्यांनी सांगितले.

श्री. लोकेश चंद्र म्हणाले, राज्यात विजेची स्थापित क्षमता सध्या ३६ हजार मेगावॅट आहे. त्यात सन २०३० पर्यत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची भर पडणार आहे. त्यामुळे राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षम ता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. यात सौर ऊर्जेचा सर्वाधिक वाटा राहणार आहे. जगातील सर्वात मोठा १६ हजार मेगावॅटचा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प राज्यात मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मधून पूर्णत्वास जात आहे. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून या योजनेद्वारे दिवसा वीजपुरवठा मिळविण्याचे शेतकऱ्यांचे स्वप्न पूर्ण होत आहे. यासोबतच प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप आदीमुळे सौर ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे, असे त्यांनी सांगितले.

संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार म्हणाले की, महावितरणकडून पहिल्या टप्प्यात ४ हजार जणांना सौर कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यात किमान ३० टक्के महिला प्रशिक्षणार्थींचे प्रमाण असेल असे नियोजन आहे. सोबतच राज्यातील बेरोजगार युवकऱ्युवतींना सौर कौशल्य प्रशिक्षण देण्यास वेग देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशियाई बँकेचे सल्लागार श्री. प्रद्योत मुखर्जी यांनी केले. मिटकॉनचे उपाध्यक्ष श्री. अभय कुलकर्णी यांनी प्रशिक्षणाबाबत माहिती दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन

**गोवा :** येत्या २१ जून रोजी संपूर्ण जगभरात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा होणार आहे. त्यासाठीच्या तयारीला वेग आला असून वैविध्यपूर्ण स्वरूपात योग दिवस साजरा करण्यासाठी विविध उपक्रम देश आणि राज्य पातळीवर राबवण्यात येत आहेत.

देशातला मुख्य राष्ट्रीय समारंभ २१ जून रोजी सकाळी ६.३० ते ७.४५ या वेळेत आंध्र प्रदेशातील विषाखापट्टणम येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. त्या दिवशी देशभरात एकाचवेळी सुमारे १ लाखाहून अधिक ठिकाणी योग दिन साजरा करण्यात येईल. 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' ही यंदाच्या योग दिनाची संकल्पना आहे.

गोवा येथील अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या वतीने राज्यातला मुख्य समारंभ 'योग संगम' म्हापूसा येथील पेडेम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मध्ये आयोजित केला आहे. या कार्यक्रमात पेडेम आणि म्हापूसा परिसरातील शालेय विद्यार्थी,महाविद्यालयीन युवकऱ्युवती, शासकीय अधिकारी-कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतील अशी माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे. केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार देशभरात हरित योग, योग संगम असे विविध उपक्रम शासकीय स्तरावर आयोजित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या वतीने राज्यातल्या विविध वारसा स्थळे, पर्यटन स्थळे, प्राचीन मंदिरे, गड-किल्ले आदि ठिकाणी हरित योग सत्रांचे आयोजन केले. यात २०० हून अधिक विद्यार्थ्यानी सहभाग घेतला. याशिवाय प्रश्नमंजूषा, वैद्यकीय शिबिरे, सामूहिक योगाभ्यास सत्रे आयोजित केली होती.

### शिंदे शिवसेनेचे 'ऑपरेशन सदावर्ते', एसटी बँकेच्या १२ संचालकांना फोडले, मेहुण्यामुळे सत्तेला सुरुंग

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पूर्णवेळ वकिली करण्याबरोबरच अर्धवेळ राजकारण करणारे वकील गुणरत्न सदावर्ते यांच्याच पॅनलमधून निवडून आलेले १२ संचालक शिंदे शिवसेनेच्या गळाला लागले आहे. सदावर्ते यांच्या पॅनेलच्या १८ संचालकांपैकी १२ संचालक बुधवारी सायंकाळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सेनेत प्रवेश करणार आहेत. त्यामुळे स्टेट ट्रान्सपोर्ट को- ऑपरेटिव्ह बँकेवर असलेल्या सदावर्ते यांच्या सत्तेला सुरुंग लागणार आहे.

गुणरत्न सदावर्ते यांच्या ताब्यात असलेल्या बँकेच्या संचालकांनी मंगळवारी मंत्री उदय सामंत यांची मुंबईत भेट घेतली. गुणरत्न सदावर्ते यांचा मेव्हणा सौरभ पाटीलविरोधात असलेला क्षोभ, आणि सेना नेते आनंदराव अडसूळ यांच्या खेळीमुळे सदावर्ते यांची साथ सोडण्यावर संचालकांचे शिक्कामोर्तब होऊन मंगळवारच्या बैठकीतच आजच्या पक्षप्रवेशावर शिक्कामोर्तब झाल्याचे समजते.

स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेचे १२ संचालक फोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सदावर्ते यांना मोठा शह दिलेला आहे. मंगळवारी सायंकाळी ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत १२ संचालकांचा प्रवेश होणार आहे. गुणरत्न सदावर्ते हे देवेंद्र फडणवीस यांच्या निकटचे मानले जातात. आता १२ संचालकांच्या सेना प्रवेशाने भाजप आणि सेनेमध्ये पुन्हा धुसफूस होण्याची शक्यता आहे.

### नांदेड अग्निशमन दलाच्या निवासस्थानाच्या रिक्त इमारतीत चोरी, गैरवापर व असामाजिक कृतींचा वाढता विळखा

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** लेबर कॉलनी परिसरात २०१९-२०२० मध्ये बांधण्यात आलेले अग्निशमन दलाचे अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे निवासस्थान अजूनही वापरात न आल्यामुळे, आता तेथे चोरी, मद्यपान, जुगार व असामाजिक वर्तनाचे अड्डे तयार झाले आहेत, असा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी एका लेखी निवेदनातून नांदेड महानगरपालिका आयुक्तांकडे केला आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, रिक्त निवासस्थानातून दारे, खिडक्या आणि अन्य साखळदारे वस्तू चोरीला जात आहेत. याचबरोबर, मद्यधुंद व्यक्ती या ठिकाणी लघवी, संडास व भांडणं करत असून, त्यामुळे लेबर कॉलनीतील स्थानिक नागरिक हैराण झाले आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, याबाबत वेळोवेळी अग्निशमन विभागाकडे तोंडी व लेखी स्वरूपात तक्रारी केल्या असूनही, कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यांनी स्पष्टपणे चेतावणी दिली आहे की, त्वरित पावले उचलली नाहीत तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. निवेदनाच्या प्रती मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

नागरिकांची मागणी: रिक्त निवासस्थानात कर्मचाऱ्यांना तातडीने रहिवासासाठी स्थलांतरित करणे. परिसरात सुरक्षा वाढवणे. असामाजिक कृत्यांवर पोलिसांच्या मदतीने बंदोबस्त ठेवणे.

# सुनियोजित आणि विकसित शहरासाठी पुढील ५० वर्षाचे नियोजन व्हावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांचे लोकार्पण व भूमिपूजन

दैनिक आपला विदर्भ

### विविध प्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण व भूमिपूजन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रभाग क्र. १६ मध्ये मुकाई चौक कृष्णा हॉटेल ते लोढा स्किमपर्यंत एक्सप्रेस हायवे लगतचा १२ मीटर डी.पी. सर्विस रस्ता विकसित करणे (भाग १ व भाग २), बापदेव मंदिर येथील किवळे गावातील मुख्य रस्ता ते एक्सप्रेस हायवेपर्यंतचा सिंबायोसिस कॉलेजमागील १८ मीटर डी.पी. रस्ता विकसित करणे, प्रभाग क्र. १६ विकासनगर येथील मुख्य रस्ता डांबरीकरण करून विकसित करणे, गवळी माथा ते इंद्रायणीनगर चौक पर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट स्केपिंग पद्धतीने विकसित करण्याच्या कामाचा भुमिपूजन तसेच पिंपरी चिंचवड शहरातील दिव्यांग नागरिकांच्या घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवनचक्राचे मॅपिंग करण्याच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला.



**पुणे/प्रतिनिधी :** पिंपरी-चिंचवड हे वेगाने विकसित होत असलेले शहर असून त्याचा विकास सुनियोजितरित्या होण्यासाठी शहराचा उत्तम आराखडा करा आणि पुढच्या पिढीचा विचार करून आगामी ५० वर्षासाठीचे नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. शहराचे नियोजन करत असतांना जनतेला विश्वासात घेणे गरजेचे असून त्यादृष्टीने लोकप्रतिनिधी आणि जनतेच्या मागणीनुसार चऱ्होलीची नगररचना योजना रद्द करावी असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने पुणे-आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी येथे उभारण्यात आलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज भेटीचे समुहशिल्प व संतसृष्टीचे लोकार्पण, संतपीठ येथील प्रेक्षागृह व कलादालन लोकार्पण यासह विविध विकासप्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, श्रीकांत भारतीय, महेश लांडगे, शंकर जगताप, माजी आमदार अश्विनी जगताप, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, जिल्हाधिकारी, संत साहित्याचे अभ्यासक ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे आदी उपस्थित होते. संत ज्ञानेश्वर माऊलींनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला आणि संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी त्यावर कळस चढविला, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्ञानेश्वर माऊलींनी सोप्या शब्दात भागवत धर्माचे तत्वज्ञान आणि वैश्विक विचार आपल्यापर्यंत पोहोचविला. त्यामुळेच माऊलीच्या पालखीत लाखो वारकरी सहभागी होतात. संत नामदेव महाराजांनी ही परंपरा आपल्यापर्यंत अभंगाच्या माध्यमातून पोहोचविताना भागवत धर्मातील हा विचार पंजाबपर्यंत पोहोचविला. शिखांचा धर्मग्रंथ गुरु ग्रंथसाहिबमध्ये संत नामदेव महाराजांचे विचार समाविष्ट आहेत. ज्यांनी भागवत धर्माला उंची दिली. अशा दोन संतश्रेष्ठाच्या भेटीचे शिल्प महानगरपालिकेने उभारले आहे. वारकरी संप्रदायात प्रत्येक जण एकमेकांना माऊली समजतो, ईश्वराचे रूप समजतो, हाच भाव या शिल्पात आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आपला वैश्विक विचार जगाला साद घालणारा जगाला साद घालणारा आणि दिशा देणारा असा आपला वैश्विक विचार आहे. एका पिढीने दुसऱ्याला दिल्याने तो टिकून आहे. सूर्य-चंद्र असेपर्यंत वारी आहे आणि तोपर्यंत विचार आहे. या विचाराच्या प्रसारासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सुंदर संतपीठ तयार केले. 'सीबीएसई' अभ्यासक्रमासोबत हा विचार पोहोचविण्याचे कार्य संतपीठाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे संतपिठाच्या विस्तारासाठी आराखडे, नियोजन केल्यास राज्य शासन त्यासाठी सर्वतोपरी मदत करेल.

नदीमध्ये जाणाऱ्या १०० टक्के पाण्यावर प्रक्रियेसाठी प्रयत्नशील इंद्रायणी नदी निर्मळ करण्यासाठी नदीमध्ये जाणारे १०० टक्के पाणी प्रक्रिया केलेले असेल यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. या माध्यमातून इंद्रायणीचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी अमृत योजनेंतर्गत दोन सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू होत आहे. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. महापालिकेचे विकास प्रकल्प नागरिकांसाठी उपयुक्त असून खेळाडू तयार करणारी पिढी घडावी यासाठी महापालिकेने उभारलेली क्लायबिंग वॉल उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार महेश लांडगे म्हणाले, राज्य शासनाने सहकार्य केल्याने पिंपरी चिंचवड परिसरात पोलीस आयुक्तालयाची आणि महानगरपालिकेची विकासकामे वेगाने होत आहेत. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी या परिसराच्या विकासाला विशेष गती दिल्याचे त्यांनी सांगितले.पोलीस आयुक्त चौबे म्हणाले, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्येष्ठानुबंध हे ॲप विकसित केले आहे. या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना पोलिसांशी संपर्क साधता येईल. २२ हजार नागरिकांनी आतापर्यंत हे ॲप डाउनलोड केले असून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगामुळे ज्येष्ठ नागरिकांना हे ॲप उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ट्रॅफिक बडी व्हाट्सअप प्रणालीच्या माध्यमातून वाहतूक नियमनात नागरिकांचे सहकार्य होईल. आतापर्यंत ३०० नागरिकांनी ट्रॅफिक बडी म्हणून नोंदणी केली आहे. पोलिसांविषयी आदर आणि विश्वास निर्माण करणाऱ्या या दोन प्रणाली असल्याचे त्यांनी सांगितले.महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकात माहिती दिली, पिंपळे सौदागर येथे गिर्यारोहणासाठी क्लायबिंग वॉल उभारण्यात आली असून हा प्रकल्प देशातील उत्तम केंद्रापैकी एक असेल. विविध विकास प्रकल्पाच्या माध्यमातून नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने विविध प्रकल्पांचे लोकार्पण, उद्घाटन व भूमिपूजन करण्यात आले. तसेच या प्रकल्पांविषयी चित्रफीत दाखविण्यात आली.

### मी खासगीकरणाचे नाही तर सहकाराचे समर्थन करतो, अजित पवारांचे वक्तव्य, म्हणाले, माझी उमेदवारी जाहीर केल्यानंतर अनेकांच्या पोटात गोळा आला

**मुंबई/प्रतिनिधी :** मी फुले, शाहू आंबेडकर यांचे विचार घेऊन पुढे चाललो आहे. कुठे डाग पडेल असे आजपर्यंत कधी मी काम केले नसल्याचे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीनिमित्ताने बारामती तालुक्यातील सांगवी गावात प्रचार सभेचं आयोजन करण्यात आले होते. यावेळी अजित पवार बोलत होते. मी खासगीकरणाचे समर्थन करत नाही. मी सहकाराचे समर्थन करतो. म्हणून एकदा मला चेअरमन व्हायचेय, मला दाखवून द्यायचा आहे की कसा चढता भाव मी पाच वर्षात देईन. मी भ्रष्टाचाराला थारा देणार नाही. मी चांगला कारखाना चालवून दाखवील असे अजित पवार म्हणाले.माझी उमेदवारी जाहीर केल्यानंतर त्यांच्या पोटात आलाय गोळा आला आहे. ते म्हणतात ब वर्गातून चेअरमन होता येत नाही त्यांना म्हणावे सहकार खाते बघितले का कुणाकडे? असा टोला देखील अजित पवारांनी विरोधकांना लगावला.

### राज्यपालांच्या उपस्थितीत लवकरच सर्व कुलगुरुंची सामायिक बैठकीचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली.

विद्यापीठांशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी आपण लवकरच सर्व पारंपरिक विद्यापीठांची संयुक्त बैठक आयोजित करू तसेच राज्याच्या कृषिमंत्र्यांसह राज्यातील कृषी विद्यापीठांना भेट देऊन तेथील संशोधनाची विस्तृत माहिती घेऊ, असे राज्यपालांनी बैठकीत सांगितले. या बैठकीत विद्यापीठांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील भरती, विद्यापीठांमधील वैधानिक पदांची भरती, उच्च व तंत्रशिक्षण विभागाची पहिल्या १०० दिवसांमधील उपलब्धी, शिकाऊ उमेदवारी संलग्न पदवी अभ्यासक्रम, कौशल्य विद्यापीठाशी सहकार्य, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, विद्यापीठांमधील प्रशासन सुधार, सर्व पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता आदी विषयांवर चर्चा झाली.उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी वेणुगोपाल रेड्डी, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती आदी उपस्थित होते.

### शेतकऱ्यांनो, फार्मर आयडी तयार करा, अन्यथा शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ जलद व पारदर्शक पद्धतीने मिळावा यासाठी 'ॲग्रीस्टॅक' योजनेअंतर्गत प्रशासनाकडून शेतकरी माहिती संच तयार करण्यात येत आहे. या अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याचा 'शेतकरी ओळख क्रमांक' (फार्मर आयडी) तयार केला जात असून, तो नसल्यास शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही, त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला फार्मर आयडी तात्काळ तयार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

बुलढाणा जिल्ह्यात अग्रीस्टॅक प्रकल्पाची अंमलबजावणी दि. १२ डिसेंबर २०२४ पासून कॅम्प मोडमध्ये, तसेच २१ जानेवारी २०२५ पासून नागरी सुविधा केंद्र व कॅम्प या हायब्रिड पद्धतीने सुरू आहे. या मोहिमेत आजअखेर ३ लक्ष ५८ हजार ६७४ शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार करण्यात आले आहेत.

दरम्यान, जिल्ह्यातील प्रधानमंत्री किसान योजनेचे एकूण ४ लक्ष ३४ हजार ४६८ लाभार्थी आहेत. त्यापैकी फक्त २ लक्ष ९४ हजार ३३९ शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार झाले असून, उर्वरित १ लक्ष ४० हजार १२९ शेतकऱ्यांनी अद्यापही नोंदणी केलेली नाही. या शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आपला शेतकरी ओळख क्रमांक तयार करून घ्यावा, अन्यथा 'पी.एम. किसान', 'पिक विमा', 'पिक कर्ज', 'पिक अनुदान' आदी योजनांचा लाभ मिळणार नाही, असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

फार्मर आयडीसाठी आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड, आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक, बँक खात्याशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक, सातबारा उतारा / गाव नमुना ८ अ.

सर्व संयुक्त व समाईक खातेदारांनी प्रत्येक सहधारकाचा स्वतंत्र फार्मर आयडी तयार करणे आवश्यक आहे. तसेच एकदा फार्मर आयडी तयार झाल्यानंतर वारंवार ई-केवायसीची गरज भासत नाही. यासाठी आपला सातबारा उतारा आधार कार्डाशी लिंक करून नजीकच्या नागरी सुविधा केंद्र (सीएससी) येथे जाऊन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी विश्वपदयात्रा ; बुलडाण्यात जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जनतेमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विश्वशांती विश्वपदयात्रा घेणारी पर्वतारोहींची चमू बुलडाणा जिल्ह्यात दाखल झाली आहे. या विश्व पदयात्रेचे नेतृत्व करणाऱ्या गिनीज बुक व लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर अवध बिहारी लाल यांच्या चमूने सोमवारी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांची भेट घेतली.

ही यात्रा डेंजर्स ॲडव्हेंचर्स अंतरवेद स्पोर्ट्सतर्फे राबविण्यात येत आहे. या चमूत जितेंद्र प्रताप, महेन्द्र प्रताप, गोविंदा नंद हे पर्वतारोही सहभागी आहेत. या यात्रेने आतापर्यंत ११ देशांमध्ये एकूण ४.४८ लाख किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण केला असून, २०१८ मध्ये जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंतची यात्रा यशस्वीरित्या पूर्ण केली. यात्रेच्या माध्यमातून १४ कोटी ५० लाख वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

देशभरातील ६०० हून अधिक जिल्ह्यांमध्ये ही पदयात्रा झाली असून, उत्तराखंड, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश, गुजरात, तसेच दमन-दीव व दादरा नगर हवेलीमध्येही जनजागृती कार्यक्रम राबवले गेले आहेत. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी २९ जिल्ह्यांमध्ये यात्रा झाली असून त्यांनी बुलडाणा जिल्ह्यात आरटीओ, वनविभाग यांच्या समवेत विविध उपक्रम राबवले.



या यात्रेचा उद्देश केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा प्रचार करणे आहे, ज्यात पर्यावरण व वन्यजीव संरक्षण, प्रदूषण नियंत्रण, पर्वत व नदी संरक्षण, बेटी बचाओ-बेटी पढ़ाओ, रस्ते सुरक्षेसंदर्भातील जनजागृती, जलसंवर्धन, स्वच्छ भारत मिशन अशा अनेक योजनांचा समावेश आहे. या यात्रेअंतर्गत शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती व सार्वजनिक ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष भेटी, व्याख्याने व जनजागृती कार्यक्रम राबवले जात असल्याची माहिती जितेंद्र प्रताप यांनी जिल्हाधिकारी डॉ पाटील यांना दिली.

# केंद्रीय मंत्री जाधव व आमदार खरात यांच्या हस्ते अतिक्रमण धारकांसाठी दुकानांचे भूमिपूजन







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** शहरातील लघू व्यावसायिक आणि अतिक्रमण धारकांसाठी १८ जून रोजी बसस्टॉप समोरील आरक्षित भूखंड क्रमांक २९, ३० व ३१ येथे शारंगधर बालाजी व्यापारी संकुलातील ३२० दुकानांच्या बांधकामाचे भूमिपूजन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव व आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते पार पडले.

न्यायालयाच्या आदेशानुसार शहरातील लोणार फाटा ते तहसील कार्यालय, डोणगाव रोड आणि जानेफळ रोडवरील अतिक्रमण हटवण्यात आले होते. यामुळे लघु व्यावसायिकांचे रोजगाराचे मोठे संकट निर्माण झाले होते. हे संकट दूर करण्यासाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी सातत्याने पाठपुरावा करत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या सहकार्याने हा महत्वपूर्ण निर्णय घेतला.एकूण ३२० दुकानांपैकी २५५ दुकानांना अतिक्रमणधारक टपरीधारकांना प्राधान्य देण्यात येणार असून उर्वरित दुकानांतून बचत गटातील महिला, विधवा, दिव्यांग यांना संधी दिली जाणार आहे. या गाळ्यांचे लवकरच सुसज्ज रूपात वितरण करण्यात येईल, अशी ग्वाही आमदार खरात यांनी दिले.मेहकर शहराच्या विकासासाठी आम्ही नेहमी कटिबद्ध आहोत. या प्रकल्पाच्या माध्यमातून शेकडो कुटुंबांना नवसंजीवनी मिळेल. विकासाच्या आड राजकारण येऊ देणार नाही,'' असे वक्तव्य त्यांनी यावेळी केले.भूमिपूजन सोहळ्यास. माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर मुख्याधिकारी रामराजे कापरे, सह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हा प्रमुख प्रा. आशिष रहाटे, शहर प्रमुख किशोर गारोळे, युवासेना ॲड. आकाश घोडे, ॲड. संदीप गवई, तसेच नगर परिषद अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ६५ गाळे आरक्षणानुसार वितरित करण्यात येणार

शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेत २५५ व्यावसायिकांचे अतिक्रमण हटविण्यात आले. नगरपालिकेने व्यापारी संकुल उभारणी करण्याचा निर्णय घेतला.५ कोटी ४१ लाख रुपये खर्चून ३२० गाळ्यांचे अद्ययावत सर्व सुविधायुक्त व्यापारी संकुल बस स्थानकात शेजारील मैदानात उभारण्यात येणार आहे. त्यातील २५५ गाळे अतिक्रमण धारकांना देण्यात येणार असून ६५ गाळे आरक्षणानुसार वितरित करण्यात येणार आहेत, लिलाव पद्धतीने गाळ्यांचे वितरण करण्यात येणार आहे. अशी माहिती मुख्याधिकारी राम कापरे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून दिली.

## विविध वृत्त...

### आदिवासी विकास योजनांसाठी ऑनलाईन अर्ज १५ जुलैपर्यंत करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आदिवासी विकास विभागातर्फे केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजनेत समाविष्ट योजनांसाठी आदिवासी बांधवांनी दि. १५ जुलै २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोलाचे प्रकल्प अधिकारी मोहनकमार व्यावहारे यांनी केले आहे.

या योजनांत ८५ टक्के अनुदानावर वनहक्कधारक आदिवासी लाभार्थ्यांना काटेरी तार, आदिवासी शेतकऱ्यांना काटेरी तार, आदिवासी युवक-युवतींना पिठाची गिरणी, आदिवासी बेरोजगार युवक-युवतींना खाद्य स्टॉल, आदिवासी शेतकऱ्यांना पावर डिलर, महिला-पुरुष बचत गटांना खाद्य स्टॉल, होजिअरी गारमेंटसाठी अर्थसहाय्य आदींचा समावेश आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी https://www.nbtribal.in या संकेतस्थळावर दि. १५ जुलै २०२५ पर्यंत सायंकाळी ६ वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत. सदर योजनांमध्ये अंशतः अथवा पूर्णतः बदल करण्याचा व कोणतीही योजना राबविण्याचा अथवा न राबविण्याचा अधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांच्याकडे राखून ठेवलेला आहे. तरी संबंधित जिल्ह्यातील आदिवासी लाभार्थ्यांनी सदर संकेतस्थळावर भेट देऊन आपले अर्ज तत्काळ सादर करावेत, असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

### जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा; २५ जुनपर्यंत अर्ज करा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हास्तरीय सुब्रोता फ ुटबॉल कप, सबज्युनियर मुले, ज्युनियर मुले, मुली क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. दि. १ ते ३ जुलै दरम्यान विविध वयोगटाच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे. क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील शाळा, संघांनी दि. २५ जूनपर्यंत ऑफलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी केले आहे.जिल्हा क्रीडा परिषद तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा व सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्ली यांच्या मार्फत २०२५-२६ या वर्षासाठी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूसाठी सबज्युनियर १५ वर्षा आतील मुले क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडू दि. १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. तसेच ज्युनियर १७ वर्षाखालील मुले, मुली दि. १ जानेवारी २००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा.

जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप सबज्युनियर, ज्युनियर क्रीडा स्पर्धेत सहभागी सर्व संघानी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापूर्वीच www.subrotocup.in या संकेतस्थळावर खेळाडू आणि संघांनी नोंदणी करणे अनिवार्य आहे. सहभागी होणाऱ्या संघांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात ऑफलाईन नोंदणी दि. २५ जुनपर्यंत करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जावर खेळाडूचे संपुर्ण नांव, जन्मतारीख, वर्ग, आधार क्रमांक, शाळेचे नांव, पत्ता, शाळेचा युडायस क्रमांक, खेळाडू स्वाक्षरी, रजिष्टर नंबर, मोबाईल क्रमांक, संस्था प्रमुख, मुख्याध्यापक यांचे स्वाक्षरीने पाठवावा. १५ वर्षाआतील खेळाडूंकरीता वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक आहे. या स्पर्धेत सहभागी १५ वर्षाआतील मुले व १७ वर्षा आतील मुले, मुली यांची स्पर्धा दि. १ ते ३ जुलै २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शाळा, संघांनी सुब्रतो मुखर्जी फ ुटबॉल कप क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑफलाईन नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी डॉ. जिवन मोहोड, राज्य क्रीडा मार्गदर्शक (फुटबॉल) यांचेशी कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडा नगरी, जांभरुन रोड, बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

### "मराठी भाषा निष्प्रभ करुन हिंदी सक्ती हा डाव"; अजित नवलेंचा हल्लाबोल

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** राज्यातील शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेल्या नव्या वादाला घेऊन म ार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने राज्य सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले. ''शुद्धिपत्रकाच्या माध्यमातून वीस विद्यार्थ्यांची अट लावत हिंदीची सक्ती म्हणजे सरकारचा मराठी भाषेला केलेला धोका आहे. हे धोरण आम्ही कोणत्याही परिस्थितीत स्वीकारणार नाही,'' अशी स्पष्ट भूमिका माकपचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी मांडली आहे.

''कर्मवीर भाऊराव पाटील स्मृतिदिनी ९ मे रोजी यासंदर्भात पक्षाच्या वतीने राज्यभर आंदोलन करण्यात आले होते. अनेक बुद्धिजीवी, साहित्यिक, कवी, शिक्षणतज्ञ व विविध राजकीय पक्षांनी सुद्धा महाराष्ट्रात हिंदी सक्तीचा तीव्र विरोध केलेला होता. या पक्षांच्या व जनतेच्या भावना लक्षात घेत महाराष्ट्रात हिंदी सक्ती केली जाणार नाही असे आश्वासन शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिले होते. मात्र, आता शुद्धिपत्रक काढत वीस विद्यार्थ्यांची अट पुढे करून सरकारने मागील दाराने हिंदी राज्यभर सक्तीची केली आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिन; 'माय भारत' व 'योगसंगम' पोर्टलवर नोंदणी करा

### जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात येत्या २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व व्यापक सहभागासह साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर योगदिनाचे आयोजन अधिक प्रभावी व व्यापक स्वरूपात होण्यासाठी 'माय भारत'आणि 'योगसंगम' या केंद्र शासनाच्या पोर्टल्सवर नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



योग हा भारताच्या प्राचीन व समृद्ध परंपरेचा अनमोल वारसा असून, शारीरिक, मानसिक व आत्मिक आरोग्यासाठी त्याचे महत्व अधोरेखित झाले आहे. योगामुळे तणाव निवारण, आरोग्यसंपन्न जीवनशैली आणि एकाग्रतेचा विकास साधता येतो. योगाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती वाढविण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषतः युवक व विद्यार्थ्यांना, https://mybharat.gov.in या पोर्टलवर स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या नोंदणीमुळे योग दिनाशी संबंधित उपक्रमांमध्ये भाग घेण्याची संधी मिळेल, तसेच योगसाधनेचे फायदे व त्याचे सामाजिक महत्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवता येईल.

जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, योग संस्था, स्थानिक मंडळे व विविध सामाजिक संस्था यांनी https://yogsangam.nic.in या पोर्टलवर आपल्या योग दिन कार्यक्रम स्थळांची नोंदणी करावी. या प्रक्रियेमुळे देशभरातील सर्व योग कार्यक्रमांचे एकत्रीकरण होईल आणि नागरिकांना त्यांच्या नजीकच्या योग उपक्रमांची माहिती सहज उपलब्ध होईल. आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ अधिक व्यापक, सर्वसमावेशक आणि यशस्वी करण्यासाठी सर्व घटकांनी सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## भूमिहीन कुटुंबांना घरकुले उपलब्ध होण्यासाठी कार्यवाही करा

**दैनिक आपला विदर्भ**

### ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :** यवतमाळ जिल्ह्यातील घरकुल नसलेल्या नागरिकांना घरकुल मिळावे यासाठी कार्यवाही करा, भूमिहीन गरीब कुटुंबांना गावठाणामधील जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात जिल्हा परिषदेने प्रस्ताव पाठवावा, अशा सूचना प्रतिपादन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केल्या.

यवतमाळ जिल्ह्यातील विविध विकास कामांबाबत मंत्रालयात ग्रामविकास मंत्री गोरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीला आमदार राजू तोडसाम, आमदार आमश्या पाडवी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले उपस्थित होते. अमरावतीच्या विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल व यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.यवतमाळ जिल्ह्यात शासनाने ६८ हजार घरकुलाना मंजूरी दिली आहे. गावठाणच्या जागेवर वर्षानुवर्ष भूमिहीन कुटुंब राहत आहेत. या पात्र कुटुंबांना घरकुल उपलब्ध व्हावे, यासाठी बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.मंत्री गोरे म्हणाले, गावठाणच्या जागेवर अनेक वर्षापासून राहत असलेल्या कुटुंबांच्या घरकुलाची जागा नियमाकूल करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव पाठवावा. बैठकीमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील १६ ग्रामपंचायत अंतर्गत पांदण रस्ते, विविध गावांमध्ये रस्त्याची कामे, यासह त्रिशंकू स्थिती असलेल्या पुनर्वासित गावाबाबत चर्चा करण्यात आली. जवळपास ३१ गावांमधील ग्रामपंचायत वार्ड निर्मिती, संबंधित ग्रामपंचायतीमधील समावेश आदीबाबत सूचना देण्यात आल्या. यावेळी जामवाडी, दर्यापूर, शिवनी सह विविध गावांच्या बाबत चर्चा करण्यात आली.

## कायाकल्प पुरस्कार योजना; बुलडाणा जिल्ह्यातील आरोग्य संस्थांची उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ''कायाकल्प पुरस्कार योजना २०२४-२५'' अंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील विविध शासकीय आरोग्य संस्थांनी उत्कृष्ट कामगिरी करून विविध श्रेणींमध्ये पुरस्कार प्राप्त केले आहेत.

यामध्ये यामध्ये मेहकर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, जानेफळ या संस्थेला जिल्ह्यातील प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून २ लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. तसेच सिंदखेड राजा तालुक्यातील उपकेंद्र, राजेगाव या संस्थेला उपकेंद्र श्रेणीत प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल १ लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे. तसेच मलकापूर तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयास प्रोत्साहनपर बक्षीस स्वरुपात १ लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय, उत्कृष्ट कामगिरीबद्दल ९ प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रत्येकी ५० हजार रुपये असे प्रोत्साहनपर बक्षीस मिळणार आहे. यामध्ये हातेडी, किन्होळा, डोणगाव, गणेशपूर, एकलारा, सुलतानपूर, रोहणा, पिंपळगाव काळे व किनगाव राजा प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे.

मलकापूर तालुक्यातील सावळी व कुंड उपकेंद्रांना अनुक्रमे दुसरा व तिसरा पुरस्कार प्राप्त झाला असून त्यांना ५० हजार व ३५ हजार पारितोषिक देण्यात येणार आहे. उर्वरित २७ उपकेंद्रांना देखील प्रोत्साहनपर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. प्रत्येक उपकेंद्राला २५ हजार रुपये पारितोषिक दिले जाईल. त्यामध्ये काळेगाव, कानझरा, दसरखेड, तालखेड, तरोडा, नायगाव दत्तपूर, रसूलपूर, लिहा, सेलूड, गोहेगाव, आसलगाव, कोर्हाळा, नांद्राकोळी, कोलवड, सारंबा, सुताळा, लव्हाळा, गाडेगाव, मंडपगाव, वेणी सुलतानपूर, झाडेगाव, बेलड, सावखेड नागरे, मासरूळ, ढाबा, तिकोडी व गोदरी या उपकेंद्रांचा समावेश आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी दिली असून कायाकल्प योजनेअंतर्गत जिल्ह्यातील आरोग्य संस्थांनी दिलेल्या सेवा व स्वच्छतेच्या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली आहे.

## रविकांत तुपकरांनी हाती धरली तिफन.. स्वतःच्या शेतात केली सोयाबीनची पेरणी

### संपूर्ण कुटुंब राबले काळ्यामातीत..

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सर्वदूर पेरणीयग्य पाऊस झाल्याने खरिपाची पेरणी सुरू झाली आहे. ''काळ्या मातीत मातीत तिफन चालते'' चे चित्र पहावयास मिळत आहे. दरम्यान शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी देखील स्वतः सहकुटुंब शेतात जाऊन सोयाबीनची पेरणी केली. रविकांत तुपकर यांनी स्वतः तिफन चालवली तर त्यांच्या पत्नी ॲड शर्वरी तुपकर यांनी व बी आणी खत पेरणी केली. संपूर्ण तुपकर कुटुंब दिवसभर काळ्या मातीत राबल्याचे दिसून आले.

राज्यात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांनी खरीपाच्या पेरणीला सुरुवात केली आहे. लहानात लहान शेतकऱ्यांपासून ते शेतकरी नेत्यांपर्यंत सगळेच सध्या पेरणीच्या कामात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे फायर ब्रँड नेते म्हणून ओळखले जाणारे रविकांत तुपकरही आज दिवसभर स्वतःच्या शेतात राबतांना दिसले. रविकांत तुपकर हे शेतकरी कुटुंबातील असून बुलडाणा नजीक असलेल्या सावळा गावात तुपकरांची शेती आहे. आज तुपकरांनी स्वतःच्या शेतात तिफन चालवून परिवारासहित पेरणी केली. सकाळ पासून रविकांत तुपकरांनी तिफन हातात घेतली तर पत्नी ॲड शर्वरी व त्यांच्या वहिनी सौं राधा तुपकर यांनी पोटाला ओट्या बांधून चाड्यावर बियाणे आणि खताची पेरणी केली. वडील चंद्रदास तुपकर व आई गीताबाई यांनी बैलांची पूजा करून नारळ फोडून पेरणीला प्रारंभ केला. रविकांत तुपकर हे स्वतः हाडाचे शेतकरी आहेत. अगदी लहानपणापासून शेतातील सर्व कामे त्यांनी केली आहेत, जनावरांचे चारा पाणी करण्यापासून दूध काढण्यापासून ते शेतातील वखरणी डवरणे अशी सगळीच कामे या शेतकरी नेत्याने वर्षानुवर्षे केली आहेत. त्यामुळे केवळ फोटोसेशन किंवा व्हिडिओ शूटिंग करण्यापुरते तिफन हाती न घेता त्यांनी प्रत्यक्ष काळ्या मातीत तिफन धरून दिवसभर पेरणी केली.





बुलढाणा जिल्ह्यात सर्वत्र सोयाबीन या प्रमुख पिकाची पेरणी केली जात आहे. रविकांत तुपकर यांनी देखील स्वतःच्या शेतात सोयाबीन आणि मूग,उडीदाची पेरणी केली. सर्जा राजाच्या पाठीवर थाप देऊन दिवसभर काळया मातीत राबणाऱ्या या शेतकरी नेत्याने सर्वांचे लक्ष वेधले होते.